Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

Original Article

# द. ता. भोसले यांच्या कथेतील स्त्री चित्रण

**रामचंद्र किसन मुजमुले[1], डॉ. विजय अर्जुन रेवजे[2]**
[1]संशोधन विद्यार्थी, उंबरे ता - पंढरपूर. जि- सोलापूर.
[2]संशोधन मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर
**Email:** rkmujmule@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180238
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(A)
Pp. 191-193
February - 2026
**Submitted:** 18 Jan. 2026
**Revised:** 28 Jan. 2026
**Accepted:** 13 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश***

*द. ता. भोसले हे मराठी ग्रामीण कथासाहित्यातील महत्त्वाचे कथाकार असून त्यांच्या कथांमध्ये ग्रामीण जीवनाचे वास्तव आणि विशेषतः स्त्रीजीवनाचे प्रभावी चित्रण आढळते. १९६० नंतरच्या ग्रामीण साहित्य प्रवाहात त्यांनी स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथांमध्ये स्त्री ही केवळ दु:खाची प्रतीक नसून ती संयमी, सोशिक, कर्तबगार आणि कुटुंबाचा कणा असलेली व्यक्ती म्हणून उभी राहते. 'मनस्विनी', 'अन्न', 'पाऊस', 'जन्म' आदी कथासंग्रहांतून त्यांनी स्त्रियांच्या विविध भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या कथांतील स्त्री दारिद्र्य, दुष्काळ, पतीचे व्यसन, सामाजिक अन्याय, जातीयता आणि पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे होणारे शोषण सहन करताना दिसते. तरीही ती खंबीरपणे संसाराचा गाडा ओढते, मुलांचे संगोपन करते आणि संकटांना सामोरे जाते. भूक – अन्नाची असो वा वासनेची – या संकल्पनेतून त्यांनी स्त्रीवरील अन्यायाचे वास्तव उलगडले आहे. समाजातील वासनांध प्रवृत्ती, स्त्रीची असहाय्यता आणि तिच्या आत्मसन्मानाचा प्रश्न त्यांनी अत्यंत संवेदनशीलपणे मांडला आहे. एकूणच, द. ता. भोसले यांच्या कथांमधील स्त्री ही दु:खाने विद्ध असली तरी ती संघर्षशील, स्वाभिमानी आणि जीवनमूल्ये जपणारी आहे. त्यांच्या लेखणीतून ग्रामीण स्त्रीच्या वेदना आणि तिची जिद्द प्रभावीपणे समोर येते.*

***मूल शब्द:*** *ग्रामीण साहित्य, स्त्री चित्रण, द. ता. भोसले, संयमशील स्त्री, कुटुंबाचा कणा, वासनेचे शोषण, दारिद्र्य, सामाजिक अन्याय, जातीयता, संघर्षशील स्त्री, ग्रामीण जीवन.*

## प्रस्तावना

१९६० नंतर मराठी साहित्यात जे अनेक प्रवाह निर्माण झाले त्यात 'ग्रामीण साहित्य' हा एक महत्त्वाचा प्रवाह मानला जातो. खरं तर ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात इतर साहित्य प्रकाराच्या तुलनेत संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या अतिशय मोलाची भर घातलेली दिसून येते. त्यामुळे खऱ्या अर्थाने मराठी साहित्याला समृद्ध करण्याचे काम ग्रामीण साहित्याने केले आहे असे म्हणता येईल. साधारण १९६० नंतर ग्रामीण कथेची निर्मिती खूप प्रमाणात करून ग्रामीण कथाकरांनी एका अर्थाने ग्रामीण कथेचा प्रांत अधिक समृद्ध केला आहे. याच प्रवाहाची व्यापकता वाढविण्याच्या दृष्टिने याच काळात आपल्या अनुभवाने दर्जेदार कथालेखन करणारे आनंद यादव, व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार, शंकर पाटील, म. भा. भोसले, रा. रं. बोराडे, भास्कर चंदनशिव, यांच्याबरोबरच द. ता. भोसले यांनीही त्याच ताकदीने कथेचे दालन समृद्ध केले आहे. त्यांनी ग्रामीण कथा प्रकारात आपल्या भारदस्त लेखणीने स्वतंत्र स्थान निर्माण केल्याने त्यांना मराठी ग्रामीण कथाकारांमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण जीवनाचे बदलते चित्र आणि त्याचे वास्तव अत्यंत भेदक आणि गंभीरतेने आपल्या कथांमधून मांडले द. ता. भोसले आहे. त्यांच्या कथा लेखनामध्ये पुरुषांबरोबरच स्त्रियांच्या व्यथा, वेदनांचा मेळ साधत त्यांच्याही भावनांना मोकळी वाट करून देऊन त्याचं दु:ख हलकं केले आहे. त्यांना आपल्या कथेत स्थान देत त्यांच्या दु:खावर मायेची फुंकर मारून गावमातीतील स्त्रियांचा भावनिक आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचाच परामर्श या लेखातून घेतला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*रामचंद्र किसन मुजमुले, संशोधन विद्यार्थी, उंबरे ता - पंढरपूर. जि- सोलापूर.*

**How to cite this article:**
*मुजमुले, . रामचंद्र . किसन ., & रेवजे, . विजय . अर्जुन . (2026). द. ता. भोसले यांच्या कथेतील स्त्री चित्रण. Journal of Research & Development, 18(2(A)), 191–193. https://doi.org/10.5281/zenodo.18937435*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18937435
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

**स्त्री चित्रणाच्या कथा**

द. ता. भोसले यांनी कथांचे लेखन करताना गावमातीतल्या आचारविचारांचा मेळ घालीत सर्वसामान्य माणसांचे दु:ख मांडून त्यांच्या भावनेला एक मोकळी वाट निर्माण करून दिली आहे. आपल्या विनोदी आणि गंभीर स्वरूपाच्या कथा लेखनातून ग्रामीण भागातल्या पुरुषांना कथेचे नायक बनवून त्यांना साहित्याच्या प्रवाहात जसे आणले अगदी तसेच खेड्यातल्या मायमाऊलींच्या दु:खाला देखील वाचा फोडण्याचं काम त्यांनी केले आहे. विविध प्रवृत्तीची गावगाड्यातली माणसं, त्यांच्यातील नातेसंबंध, कुटुंबपद्धती, पूर्वांपार चालत आलेल्या रूढी, परंपरा हे त्यांच्या कथा लेखनाचे विषय असून या सर्वच कारणांमुळे स्त्रीची होणारी घुसमट, अवहेलना, स्वत:च्या घरात मिळालेली दुय्यम वागणूक, आपल्याच जवळच्या नात्यातील लोकांनी दिलेली अपमानास्पद वागणूक अशा अनेक गोष्टींमुळे स्वत:चा आत्मसन्मान हरवून बसलेल्या स्त्रीला द. ता. भोसले यांनी आपल्या कथेत स्थान देऊन तिच्या भावना समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी लिहिलेल्या सर्व कथासंग्रहातून स्त्री वेगवेगळया भूमिकेतून सक्षमपणे आलेल्या परिस्थितीला तोंड देताना दिसते. विशेष म्हणजे त्यांचा 'मनस्विनी' हा स्त्रीप्रधान कथासंग्रह असूनग्रामीण भागातील स्त्रियांची विविध रूपे यातून पाहायला मिळतात.

**सोशिक व संयमशील स्त्री**

द. ता. भोसले यांचा जन्म ग्रामीण भागात आणि अत्यंत गरीब कुटुंबात झाला असल्याने सर्वसामान्य माणसाला स्वत: च्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी किती अट्टाहास करावा लागतो याचे ते स्वत: च साक्षीदार असल्याने त्यांच्या कथेत जिवंतपणा आला आहे. भूक, उपासमार, दारिद्र्य, दुष्काळ यामुळे तर खेड्यातला माणूस पार खचून गेला आहे. आपली पुरुषप्रधान संस्कृती असल्याने गावगाड्यातील स्त्री अधिकच घुसमटून गेल्याने तिच्या मनात साठलेल्या भावनांचं कोंदण द. ता. भोसलेंच्या कथेत पहावयास मिळते. त्यांच्या गंभीर कथांमधून स्त्रीच्या वाट्याला आलेले जीणं आपल्या प्रभावी लेखनाने अधिक गडद करून तिला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या 'अन्न' कथासंग्रहातील 'भूक' कथेची नायिका 'गजरा' पतीप्रेमापासून वंचित आहे. घरासमोरील गुराढोरांचा, शेळयांचा प्रणय पाहून तिच्या कामभावना उचंबळून येतात. पतीविरह कोणाला सांगून कमी होत नाही. पण तिचे अंतरिक उमाळे आणि मनाची होणारी घालमेल आणि यातूनही तिनं राखलेला संयम वाचकांना अंतर्मुख करतो. 'रात्र' कथेची नायिका 'काशी' आपल्या दारुड्या नवऱ्याचा रोज मार खाते. त्याचे सर्व नखरे सहन करत आपल्या फाटक्या संसाराला ठिगळं लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न करताना दिसते. 'किंमत' कथेतील 'रखमा' दुष्काळाच्या झळा सोसते. 'करामत' कथेतील 'किष्णा' आपल्या वाट्याला आलेले भोग विनातक्रार सहन करत जीवन जगते.

गावातील लोकांच्या वासनेनं बरबटलेल्या नजरांचे डंख सहन करीत 'व्यवस्थित' कथेतील नायिका जगणं असह्य झाले असले तरी सुद्धा आपल्या मुलासाठी सारं सहन करते. कुटुंबापुढे स्वत:च्या इच्छा आकांक्षाचा, सुखासमाधानाचा फारसं विचार न करता आपल्या मुलांबाळासाठी, नवऱ्यासाठी सारं काही सहन करत संसार चालवताना 'कौसा' ची होणारी ओढाताण 'पाऊस' कथासंग्रहातील 'कोसळलेली' कथेत शब्दबद्ध केली आहे. 'जहाज' कथेतील 'जिजाई' चा विवाह होताच नवरा परागंदा होतो तो कायमचाच. पतीविरह सहन करत उरलेलं आयुष्य कसबसं जगण्यासाठी उसनं आवसान आणण्याचा प्रयत्न करते. 'मरणकळा' कथेतील 'कस्तुरा' केवळ डोंबारीन असल्याने ती मेल्यानंतर तिचं प्रेत नेमकं कोणत्या स्मशानभूमीत जाळायचं की पुरायचं हा प्रश्न निर्माण होतो. जातीयतेचं दु:ख किती भयाण आहे याची दाहकता भोसलेंनी या कथेतून मांडली आहे. एकूणच द. ता. भोसले यांच्या कथेतील स्त्रीया संयमी, सोशिक असून त्या विचारी आहेत. त्यांच्या वाट्याला आलेल्या संकटावर मात करत जगण्याची धडपड त्यांच्या वागण्यातून दिसून येते. स्वत: बरोबर कुटुंबातील लोकांच्या मुलभूत गरजा पूर्ण करताना त्यांची होणारी हेळसांड, मनाची होणारी घालमेल, परिस्थितीने हतबल झाल्याने आपले सर्वस्व पणाला लावले आहे. त्यांच्या कथेच्या नायिका आपल्या पतीसाठी, मुलांसाठी एकूणच साऱ्या कुटुंबासाठी सगळं सहन करून निर्माण झालेल्या परिस्थितीला दोन हात करण्याची तयारी दर्शवितात याचे संवेदनशीलपणे केलेले चित्रण वाचकांना विचार करायला लावणारे आहे. परमेश्वराने पुरुषांपेक्षा स्त्रीला सहनशीलता नावाचा गुण अधिकच दिला असावा हे भोसलेंच्या कथेतील नायिकांच्या संयमावरून लक्षात येते.

**कुटुंबाचा कणा असणारी स्त्री**

द. ता. भोसले यांचे कथा लेखन हे समाजातील सर्वच स्तरातील माणसांचे दु:ख शोधण्यासाठी अठरापगड जातीधर्माच्या स्त्री पुरुषांना कथेचे नायक बनवून त्यांच्या दु:खावर फुंकर घातली आहे. पुरुषांपेक्षा स्त्रीया अधिक कणखर, सोशिक, स्वाभिमानी, प्रामाणिक आणि कष्टाळू आहेत. त्यांच्या 'पाऊस' कथासंग्रहामधील 'पाऊस' कथेतील 'भागू' ही पावसामुळे हाताला काम मिळत नसल्याने तिच्या पोराबाळांची आबाळ होते. स्वत:च्या पोटाला चिमटा घेऊन पोरांच्या पोटाच्या काळजीपोटी पायाला भिंगरी बांधून फिरते. पण हाती काहीच न लागल्याने निराश होऊन घरी येताना हॉटेलमधील रात्रीचा फेकून दिलेला शिळा भात पोराला खाऊ घालते. पोरगं बेशुद्ध पडतं. भागू मात्र स्वत: ला दोष देत ऊर बडवून घेते. कर्ता पुरुष जेव्हा घरातील जबाबदारी झटकून रिकामटेकडा फिरतो तेव्हा त्याची बायको 'रखमा' स्वत: दोन मुली आणि म्हातारी सासू यांचा सांभाळ करून कुटुंबाचा आधार बनते. घरात कमावणारे हात कमी आणि खाणारे हात जास्त असल्यावर अशातच बीनकामाचा नवरा मिळाल्यावर त्या घरातल्या बाईचं जीवन किती कष्टप्रद असते याचे विदारक चित्र 'निर्णय' कथेत 'धुरपा' च्या रूपाने साकारले आहे. धुरपा सारखीच अवस्था 'जन्म' कथासंग्रहामधील 'ओझं' कथेतील 'गोकुळा' ची झाली आहे. गोकुळा पोटुशी असून तिचा जीव कामानं आणि पोटाच्या ओझ्यानं पार दमून गेल्याने संसाराचा गाडा चालवताना तिची दमछाक झाली आहे. नवऱ्याचं आजारपण, मुलाबाळांचं संगोपन अशा अनेक प्रश्नाने 'प्रकाश पावले' कथेतील 'गोदा' हतबल झालेली संसाराला कंटाळून जाते. अशावेळी तिला एका मंदिरात एका स्वामीकडून जीवनाकडे सकारात्मक दृष्टिने पहाण्याचे आत्मबळ मिळते. गोदा पुन्हा कंबर कसून जोमाने संसार उभा करते. दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून आपल्या अपंग पती व मुलांना सांभाळणाऱ्या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

'अन्नदान' कथेतील 'आनसा' ची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने पोरांना गोडधोड खायला घालता न आल्याने ती कष्टी होते. गावातल्या कार्यक्रमात पोरांना पहिल्या पंगतीला जेवायला बसवून पाणी कमी प्यायला सांगून बुंदी जरा जास्त खायला सांगते. पोटभरून खाऊन झाल्यानंतर तिची मुलगी चंदा 'अजून कुणी मेलं तर काय मजा येईल ग आई'. असं त्या बालमनाला वाटून जाते. पोटाची खळगी भरताना किती संघर्ष करावा लागतो याचे भीषण वास्तवाचा शोध प्रस्तुत कथेतून द. ता. भोसले यांनी घेतला आहे. समाजातील काही पुरुषांच्या नाकर्तेपणामुळे ग्रामीण भागातील स्त्रीयांचा आपला संसारगाडा चालविण्याचा आटापिटा वाचकांना चिंतन करायला लावणारा आहे. चैनीखोर, ऐतखाऊ, स्त्रियांच्या जीवावर जगणारे स्वार्थी पुरुष स्त्रियांच्या दु:खाला कारणीभूत ठरतात. पुरुषी वागण्याला न जुमानता स्वभिमानाने आणि प्रामाणिकपणे ग्रामीण भागातल्या स्त्रियांनी आपल्या देहाचाच खांब करून घराला घरपण दिलं आणि कुटुंबाचा कणा ताठ ठेवला याचा प्रत्यय द. ता. भोसले यांच्या कथेतून आला आहे.

**वासनेची शिकार झालेली स्त्री**

समाजातील स्त्री जातीचे शोषण सर्वच बाजूने होताना दिसते. द. ता. भोसले यांनी आपल्या निरीक्षणातून हेच स्त्रियांचे दु:ख अतिशय संवेदनशीलपणे मांडून समाजातील स्त्रीवर्ग सुखी व्हावा म्हणून त्यांच्या दु:खाला आपल्या लेखणीतून वाचा फोडली आहे. द. ता. भोसले यांचा 'भूक' हा चिंतनाचा विषय असून तो आपल्या कथांमधून अतिशय गांभीर्याने हाताळला आहे. भूक अन्नाची असो वा वासनेची ह्या पूर्ण नाही झाल्या तर माणसांचा फार कोंडमारा होतो. कामवासना माणसाला कोणत्याही थराला घेऊन जाते. याच वासनेच्या शिकार झालेल्या स्त्रियांचे करुण आणि भेदक चित्रण द. ता. भोसले यांनी आपल्या कथांमधून केले आहे. त्यांच्या 'मोबदला' कथेतील भिकारीण आपल्या पोटाची भूक भागविण्याकरिता श्रीमंत व्यक्तीच्या दारात भीक मागायला जाते. भीक मागायला आलेल्या भिकारणीला पाहून सुशिक्षित तरुणाच्या मनात वासनेची भूक पेट घेते. त्याच्या वासनेची भूक अधिकच तीव्र होते अशातच तिला आपल्या बहुपाशात ओढून क्षणाचाही विलंब न आपली कामवासना पूर्ण करतो. आपली अब्रू जाऊ नये म्हणून त्याबदल्यात भिकारणीला पाहिजे ते द्यायला तयार होतो. पण भिकारीण पोटाला खायला अन्न मागते. परस्पर विरोधी भूकांच्या तीव्रतेची दाहकता फारच भयाण असून त्यात स्त्री मात्र अक्षरक्ष: होरपळली आहे.

दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून विधवा 'किष्णा' आपली उपजीविका करत असताना गावातील स्त्रीलंपट लांडग्यांच्या कामुक नजरेला सामोरे जावे लागते. 'बाजार' कथेतील 'चंपा' नवरा जिवंत असून देखील त्याचा कसलाही आधार नसताना आपल्या आईबरोबर रोज लोकांच्या शेतात राबून स्वत: चे मुलाचे कसेबसे तरी पोट भारत असताना तिच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याच गावातील देसाई तिची अब्रू लुटतो. पुरुषांचा आधार नसलेल्या स्त्रियांना अशा प्रकारे अनेक संकटांना आपला जीव मुठीत धरून सामोरे जावे लागते. बरबटलेल्या नजरेनं आणि कामवासनेच्या आहारी गेलेल्या संवेदनशून्य समाजाला अशा स्त्रीया म्हणजे आयतचं सावज मिळाल्यासारखं त्यांच्या शरीराचे लचके तोडायला मागेपुढे पाहात नाही. याच समाजाने 'मनस्विनी' कथेतील जोगतीणची मुलगी 'चंदा' च्या वयाचा देखील विचार न करता ती उपवर होण्याअगोदरच लोकांच्या वासनेला बळी पाडले आहे. अस्पृश्य समाजातील भोळी आणि मंद असणारी 'नबी' गावातील पाटलांच्या वाड्यात ताक आणायला गेल्यावर घरी कुणीच नसल्याचा गैरफायदा घेत पाटील नबीची बळजबरीने अब्रू लुटतात. आपला सगळा कार्यभार उरकल्यावर मात्र पाटील नबीला ताक वाढताना तिच्या भांड्यात वरून ताक घालतात. "माझ्यावर जबरदस्ती करताना शिवाशिव चालते आणि ताक वाढताना मात्र शिवाशिव चालत नाही". नबीच्या या 'सवाला' मुळे पाटलाच्या तोंडात मारल्यासारखं झालं. अस्पृश्य समाजातील स्त्री जणू आपलीच आहे असं समजून त्यांच्या नेमक्या नसा ओळखून त्यांच्यावर गारुड घालून आपल्या जाळयात ओढून त्यांच्या अब्रूशी खेळण्याचा असुरी प्रकार गावमातीतली मातब्बर मंडळी करताना दिसते याचेच वास्तव चित्रण द. ता. भोसले यांनी आपल्या कथेतून करून त्यातील भीषणता अधिक गडद केल्याचे दिसून येते. द. ता. भोसलेंच्या कथेतील स्त्री ही स्वत: साठी जगण्यापेक्षा आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करण्यात दंग असून प्रसंगी जीवाची पर्वा न करता, अनेक प्रसंगांना तोंड देऊन संसाराचा गाडा ओढताना दिसते. मुलभूत गरजा पूर्ण करताना संघर्ष करत धीराने आणि संयमाने अनेक संकटांना तोंड देत कुटुंब जगवते. तिच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन कित्येक वेळा तिच्यावर अतिप्रसंग करून जबरदस्तीने तिच्या शरीराचे गिधाडासारखे लचके तोडले आहेत. तिच्याच घरातून तिला पुरुषाचं पाठबळ नसल्याने तिच्या अशा या अगतिकतेचा समाजाने गैरफायदा घेत तिला आयुष्यातून उठविण्याचा अघोरी प्रयत्न केलेला दिसून येतो. माणसांच्या जीवनातील दु:खाचा शोध घेताघेता समाजात पुरुषांपेक्षा स्त्रीच्याच वाट्याला आलेलं दु:ख अधिक असून द. ता. भोसले यांनी हेच ओळखून आपल्या कथांमधून स्त्रीच्या दु:ख मुक्तीसाठी आपली लेखणी अधिक धारदार करून त्यांच्या दु:खाला वाचा फोडण्याचं काम केले आहे. आपल्या जिव्हाळयाचा विषय समजून अतीव दु:खांमुळे स्त्री वर्गाला झालेल्या जखमांवर भोसलेंनी फुंकर मारून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ सूची**

१. कोत्तापल्ले नागनाथ, ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि शोध, स्वरूप प्रकाशन, प्रथमावृत्ती, औरंगाबाद २००७
२. भोसले. द. ता - अन्न, अस्मिता प्रिंटर्स प्रकाशन, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, १९७६
३. भोसले. द. ता - पाळत, साविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती, सोलापूर, १९७८
४. भोसले. द. ता. - अगं अगं म्हशी, साविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती, सोलापूर. १९८२
५. भोसले. द. ता - पाऊस, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती, पुणे, १९८४
६. भोसले. द. ता - मनस्विनी, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती, पुणे, १९९५
७. भोसले. द. ता - खसखशिचा मळा, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती, पुणे, १९९९
८. भोसले. द. ता - जन्म, शब्दालय प्रकाशन, प्रथमावृत्ती, श्रीरामपूर, २००३
९. भोसले. द. ता - सुखाचा शोध, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, २०१९